# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. ११-२०२२** **दिनांक १०/०१/२०२२**

**जोधपुर राजस्थान येथे आरोपीस न्यायालयात पेशी दरम्यान हजर करणा-या पोलीस कैदी पार्टीवर गोळीबार करुन कैदी पार्टीमधील आरोपीताचा खुन करणा-या टोळीतील मुख्य सुत्रधार आरोपीतास ताब्यात घेण्यात वालीव गुन्हेप्रकटीकरण शाखेस यश**

जोधपुर सिटी पुर्व राजस्थान रातानाडा पोलीस ठाणे ठाणे गु.रंन ०४९५/२०२१ भा.द.वि.स कलम ३०२, ३३२, ३५३,३०७,३४, १२०(ब) सहा आर्म अॅक्ट-३,२५,२७ अन्वये दिनांक-१८/१२/२०२१ रोजी गुन्हा दाखल आहे. दिनांक-१८/१२/२०२१ रोजी १६.१५ वा ते १७.०० वा दरम्यान राजस्थान पोलीस पार्टी आरोपीत नामे-कालुपरी उर्फ प्रदीपपुरी शंकरपुरी गोस्वामी, वय-३१ वर्षे यास मा.न्यायालयात पाली येथे हजर करुन मध्यवर्ती कारागृह जोधपुर येथे घेवुन जात असताना भाटी चौराह जोधपुर येथे दोन अनोळखी इसमानी आरोपी व पोलीसांवर ६ गोळी फायर करुन मोटार सायकलवरुन पळुन गेले होते. त्यातील ३ गोळया आरोपीत कालुपरी उर्फ प्रदीपपुरी शंकरपुरी गोस्वामी यास लागल्याने तो जागीच मयत झाला होता. सदरचा गोळीबार हा दोन टोळयामधील वादातुन झाल्याने सदर बाबत वरील प्रमाणे गुन्हा नोंद होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने रातानाडा पोलीस ठाणे येथील पो.उप.निरी/भवरसिंग व १ अंमलदार यांनी वालीव पोलीस ठाण्यात येवुन पोलीस मदत मिळणे बाबत रिपोर्ट दिला व सदर आरोपीत हा दोन टोळी युध्दातील महत्वाचा सुत्रधार आरोपीत असल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेस सदर राजस्थान पोलीसांना मदत करण्या बाबत आदेशीत केले होते. वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथक व राजस्थान पोलीस यांचे संयुक्त पथक तयार करुन सदर गुन्हयातील आरोपीताचे मोबाईल क्रमांकाचे तांत्रीक विश्लेषण करुन आरोपीत याचा कॉलरची माहीती प्राप्त करुन कॉलर यास ताब्यात घेवुन आरोपीत बाबत चौकशी केली असता आरोपीत हा १० मीनटांपूर्वी बोरवली मुंबई बाजुकडे गेला असल्याबाबत माहिती मिळाल्याने सदर आरोपीत याचा पाठलाग करुन बोरीवली येथील एम.सी.एफ गार्डन येथुन आरोपीत शिवरतन उर्फ प्रिन्स भवरसिंग राजपुत रा. राजस्थान यास ताब्यात घेवुन पुढील चौकशी कामी राजस्थान पोलीसाचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि./ज्ञानेश फडतरे, पो.हवा./मनोज मोरे, मुकेश पवार, पो.ना./किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतीश गांगुर्डे, पोअंम/गजानन गरीबे, सुर्यकांत मुंढे, सचीन खताल, जयवंत खंडवी यांनी केलेली आहे.